डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६२२६८८/८९
मोबाईल : ९८८१९०८०२०
०२०–२५६२२६९२

संदर्भ : रासेयो/२०२१/२२८ दि. ०२/०६/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे, अहमदनगर, नाशिक.

विषय : कोरोना(कोविड–१९) या आपत्ती जनक काळात रासेयो महाविद्यालयांनी राबविलेल्या उपक्रमांमुळे विद्यापीठ अधिकारी मंडळाच्या अभिनंदनास पात्र

महोदय,

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि आभार!

कोरोना (कोविड –१९) या आपत्ती जनक काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक यांनी विविध स्तरावर उत्कृष्ट असे काम केले आहे. या काळात सर्वच महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या परिपत्रकांना प्रतिसाद देत शासनाच्या 'माझे कुंटुब माझी जबाबदारी', रक्तदान अभियान, प्लाइमा दान, गरजू व्यक्तींकरिता अन्नदान वाटप अशा विविध उपक्रमात योगदान दिले आहे.

मा. कुलगुरू, मा. प्र–कुलुगुरू, मा. कुलसचिव यांनी नेहमीच राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. दि. ९ जानेवारी, २०२१ रोजी विद्यापीठाच्या अधिसभेमध्येही अधिसभा सदस्य, मा.प्रा. देशमुख शामकांत श्रीकांत व मा. प्राचार्य डॉ. व्ही.बी. गायकवाड यांनी या कोव्हीड काळातील रासेयो उपक्रमात सहभागी सर्व प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी स्वयंसेवक, मा. कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू, मा. कुलसचिव, सर्व शिक्षकेतर सेवक यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित केला आहे.

आपल्या सर्वांच्या सामूहिक योगदानावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रभावीपणे कार्यरत आहे व आपण केलेल्या संरचनात्मक व सघंरचनात्मक सहकार्यामुळेच विद्यापीठ अधिकार मंडळाच्या अंभिनदनास पात्र ठरलो आहेत. कोरोना (कोविड–१९) या आपत्तीकाळात दिलेल्या योगदानाबद्दल आपण सर्वांचे पुन्हा एकदा मनापासून आभार व अभिनंदन! पुढील काळातही अविरतपणे कार्यरत राहू, ही सदिच्छ! कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना